

आर्थिक समृद्धी की ओर

# GOLDEN FUTURE

## LIFE CARE PVT. LTD.

AN ISO 9001:2015 Certified Company

**शेतकऱ्यांसाठी नव संजीवनी**

**अत्याधुनिक बायो तंत्रज्ञान कृषीधन**

### बायो कृषीधन :

जागतिक शेती उत्पादनामध्ये भारतासारख्या खंडप्राय कृषीप्रधान देशाचा १६ टक्के वाटा असून या देशाची जवळपास ६० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागामध्ये राहते. सहाजिकच त्याचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. परंतू ही शेती आलिकडच्या काळात अनेक त्रुटी अडचणी आणि समस्यांनी घेरलेली आहे. उदा. ग्लोबल वॉर्मिंगमुळे बिघडलेला नैसर्गिक समतोल, दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य, अतिरिक्त खत व पाणी व्यवस्थापनामुळे क्षारपड जमिनीचे वाढणारे क्षेत्र, दिवसेंदिवस वाढत्या रोगराई, किडी व व्यांधींच्या नियंत्रणासाठी भरमसाठ रासायनिक किटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके, संजीवके आदींचा महागडा व हानिकारक वापर त्याचबरोबर रासायनिक खतांच्या वाढत्या किंमती व कमी उपलब्धता तसेच उत्पादित मालाचा कमी टिकाऊपणा परिणामी खर्च जास्त मात्र नफा कमी ह्या सर्व बाबींचा विचार करुन 'बायो कृषीधन' हे सर्वांगिण उपयुक्त असे जैविक उत्पादन आणले आहे.

### बायो कृषीधन :

हे उत्कृष्ट मायक्रोबल ब्राथ टेक्नॉलॉजीने दर्शविणारे नैसर्गिक स्वरुपातील विविध जैविक घटकाचे मिश्रण आहे. जमिनीचे आणि पिकाचे सुरक्षित असे पौष्टीक अन्न म्हणून ते उपयुक्त ठरते. मातीला व पिकाला सशक्त, निरोगी आणि आरोग्यदायी ठरवणाऱ्या या जैविक उत्पादनामध्ये मुख्य अन्नद्रव्य म्हणजेच नत्र स्फुरद, पालाश तसेच दुय्यम अन्नघटक म्हणजेच कॅल्शियम, मॅग्नेशिअम, सल्फर व सुक्ष्म अन्नद्रव्ये म्हणजेच झिंक, फेरस, मँगनीज, कॉपर, बोरॉन, मॉलिब्डेनम् इ. मुबलक प्रमाणात समाविष्ठ केलेली आहेत.त्याचबरोबर विविध प्रकारच्या ॲमिनोज गटातील घटकाचे मिश्रण, विविध प्रकारच्या समुद्री वनस्पतीचे अर्क (सिवीड एक्सट्रॅक) पिकांना पाण्याचा ताण सहन करायला लावणारी केओलीन वर्गातील संयुगे, व्हर्टीसिलिअम् लिकानी, बिव्हेरिया बायायनिया जीवाणूचे अद्वितीय मिश्रण, पिकांच्या पानावर व जमिनीत मुरण्यासाठी, पसरवण्यासाठी तसेच क्रियाशीलतेसाठीचे विविध सेंद्रीय घटकाचे मिश्रण, नैसर्गिक स्वरुपातील बॅसिलस, पाश्चुराईज, बॅ. पॉलिनिक्स, ब्रॅ. फेज्युनेरीचिई, सुडोमोनस स्पेसीज, प्रोटेअस, व्हल्जरीस, स्पोरोसरसीना युरियाई, प्रोअस्, स्पेसीज, स्पोरोसरसीना स्पेजीस आदीचे मिश्रण अर्थात नैसर्गिक स्वरुपातील क्रुड एकस्ट्रॅक्टचा अंतर्भाव केलेला आहे.

### बायो कृषीधन वापरल्याने कोणते फायदे होतात :

❋ पिकांचा सर्वांगिण विकास. ❋ फुलफळ व मोहरगळ थांबते. ❋ फळाचा आकार, रंग व चव यामध्ये सुधारणा होते. ❋ पिकांच्या रोग प्रतिकारक शक्तीमध्ये वाढ होते. ❋ प्रकाश विश्लेषण क्रियेचा वेग वाढतो. ❋ पिके पाण्याचा ताण सहन करतात. ❋ मुख्य, दुय्यम व सुक्ष्म अन्नद्रव्ये पिकास उपलब्ध होतात. ❋ पिकावरती एकसारखी काळोखी टिकून राहते. ❋ जमिनी मधील उपलब्ध अन्नद्रव्याचा अपटेक वाढतो. ❋ सेंद्रीय उत्पादन असल्यामुळे पर्यावरणास पुरक आहे. ❋ मात्र किटकांना कोणताही उपद्रव्ये होत नाही.

### बायो पुर्णा प्लस

यामध्ये नैसर्गिक स्वरूपातील नत्र, स्फुरद व पालाश यांची समान मात्रा असलेने, हे जमिनीला व फवारणीसाठी कोणत्याही पिकांना दिले असता पिकांची संतुलित वाढ करते. पाने हिरवी गर्द होतात. पानांचा आकार वाढतो. खोडांची समान वाढ होते. त्यामुळे कोणत्याही पिकांच्या वाढीच्या अवस्थेत उदा. भाजीपाल्यांसारख्या अल्पकालावधीच्या पिकांना प्रती एकर दर ५ ते ७ दिवसांनी १ लिटर व ऊसासारख्या किंवा जास्त कालावधीच्या पिकांना दर पंधरा दिवसांनी प्रति एकर १ लिटर ठिबकद्वारे अथवा शंभर लिटरच्या मात्रा बारीक चावीद्वारे पूर्ण एकराला द्यावी.








## बायो संपूर्णा प्लस

यामध्ये नैसर्गिक स्वरूपातील नत्र, स्फूरद व पालाश हे तिन्ही घटक असून याचा वापर शक्यतो कोणतेही पीक फुलकळीच्या अवस्थेत असताना दिल्यास भरपूर प्रमाणात फुल कळी निघते. तसेच फूलगळ थांबते, फुलांचे फळात रुपांतर होते व फळगळही थांबते, पिकांची वाढही संतुलित होते. वरील फुलकळीचे अवस्थेत अल्पकालावधीच्या पिकांना प्रति एकर दर ५ ते ७ दिवसांनी १ लिटर व ऊसासारख्या किंवा जास्त ठिबकद्वारे अथवा शंभर लिटरच्या प्लॅस्टिक ड्रमच्या बुडाला चावी बसवून ड्रम पाण्याने पूर्ण भरावा व वरील मात्रा ड्रममध्ये मिसळून मेन पाण्याला चेबरजवळ ड्रम ठेवून सदरची मात्रा बारीक चावीद्वारे पूर्ण एकराला द्यावी.

## मल्टी बुस्टर

यामध्ये नैसर्गिक स्वरूपातील नत्र व स्फुरद हे दोन घटक आहेत. यात स्फूरदांचे प्रमाण जास्त असलेने याचा वापर अल्पकालावधीच्या पिकांना प्रती, एकर दर ५ ते ७ दिवसांनी १ लिटर व ऊसासारख्या किंवा जास्त कालावधीच्या पिकांना दर पंधरा दिवसांनी प्रति एकर १ लिटर ठिबकद्वारे अथवा शंभर लिटरच्या प्लॅस्टिक ड्रमच्या बुडाला चावी बसवून ड्रम पाण्याने पूर्ण भरावा व वरील मात्रा ड्रममध्ये मिसळून मेन पाण्याच्या चेंबरजवळ ड्रम ठेवून सदरची मात्रा बारीक चावीद्वारे पूर्ण एकराला द्यावी. याच्या वापराने सर्व पिकांना पांढऱ्या मुळ्या भरपूर प्रमाणावर सुटतात. सर्व पिकांचे आयुष्य वाढते. जमीन भुसभुशीत होऊन पाणीधारणा क्षमता वाढते.

## एव्हरेज प्लस

यामध्ये नैसर्गिक स्वरूपातीलफक्त पालाश हा घटक असून याचा वापर कोणतेही पीक पक्वतेकडे जात असताना करावा. यामुळे उत्पादित मालाचे वजन वाढते. कोणतेही पिक किंवा फळ चांगले पक्व होते. खोड कणखर होते. पानांची जाडी वाढते. मालाचा टिकाऊपणा वाढतो. बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. इ. फायदे होतात. याचा वापर फळे लागल्यानंतर अल्पकालावधीच्या पिकांना प्रति एकर ५ ते ७ दिवसांनी १ लिटर व ऊसासारख्या किंवा जास्त कालवधीच्या पिकांना दर १५ दिवसांनी ठिबकद्वारे अथवा शंभर लिटरच्या प्लॅस्टिक ड्रमच्या बुडाला चावी बसवून ड्रम पाण्याने भरावा व वरील मात्रा ड्रममध्ये मिसळून मेन पाण्याला चेंबरजवळ ड्रम ठेवून सदरची मात्रा बारीक चावीद्वारे पूर्ण एकराला द्यावी.

## मल्टी प्लस

यामध्ये नैसर्गिक स्वरूपातील स्फुरद व पालाश हे दोन घटक असून कोणत्याही पिकांच्या पानाची जाडी, रुंदी, काळोखी तसेच खोडांची जाडी व खोडामध्ये मुलद्रव्यांचा साठा, फळांचा आकार व वजन, चकाकी, टिकाऊपणा यांच्या वापराने वाढतो तसेच रोगांचे प्रमाण कमी होऊन उत्पादनात वाढ होते. अल्पकालावधीच्या पिकांना प्रति एकर दर ५ ते ७ दिवसांनी १ लिटर ठिबकद्वारे अथवा शंभर लिटरच्या प्लॅस्टिक ड्रमच्या बुडाला चावी बसवून ड्रम पाण्याने पूर्ण भरावा व वरील मात्रा ड्रममध्ये मिसळून मेन पाण्याच्या चेंबरजवळ ड्रम ठेवून सदरची मात्रा बारीक चावीद्वारे पूर्ण एकराला द्यावी.

तसेच दर ७ ते १० दिवसांनी प्रति लिटर पाण्यासोबत २ ते ३ मिली घेऊन सर्व पिकांना फवारणीही द्यावी.

तसेच दर ७ ते १० दिवसांनी प्रति लिटर पाण्यासोबत २ ते ३ मिली घेऊन पिकांना फवारणीही द्यावी. ही सर्व सेंद्रिय एन. पी. के. वरीलप्रमाणे वापर करत गेल्यास जमीन समृध्द होऊन भांडवली खर्च कमी होतो व उत्पादनात सव्वा ते दीड पटीने वाढ होते.

अत्यंत महत्वाचे म्हणजे यामध्ये एन. पी. के सोबत सीवीड अर्क, सुक्ष्म मुलद्रव्ये व एन्झाईम्सचाही अनोखा मिलाफ साधला आहे. एन्झाईम्समुळे जमिनीतील अविद्राव्य अन्नद्रव्ये पिकांना उपलबध करुन दिली जातात. पिकांची चयापचय क्रिया वाढते. नवीन पेशींची निर्मिती जास्त संख्येने होते. जमिनी भुसभुशीत होऊन पाणीधारण क्षमता वाढते. परिणामी पिकांचे आयुष्य वाढते. वरील सर्व प्रोडक्ट सर्व पिकासाठी सर्व अवस्थेमध्ये आपण वापरु शकतो. अधिक माहितीसाठी कंपनीच्या ॲप किंवा एक्झीकेटीव्हशी संपर्क साधावा.


### ✻ आमचा पत्ता ✻

# गोल्डन फ्युचर लाईफ केअर प्रा. लि.

**ऑफिस नं. १, पहिला मजला, ईडन गार्डन, खानविलकर पेट्रोलपंप जवळ,**
**नागाळा पार्क, कोल्हापूर फोन नं. ८४५९३२४९५०**

www.goldenfuture.life